# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## जिल्हा आरोग्य अधिकारी
## जिल्हा परिषद, नागपूर

## सिकलसेल पिअर सपोर्टर/एज्यूकेटर पद भरणे तथा पुढील भरतीसाठी प्रतिक्षा यादी तयार करण्यास्तव थेट मुलाखत

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर यांच्या मार्फत राबविण्यात येत असलेल्या सिकलसेल कार्यक्रमाचे अंमलबजावणी व सनियंत्रणाकरीता सन २०२३-२४ मध्ये जिल्हयात एकूण १४ तालुक्याकरीता **सिकलसेल पिअर सपोर्टर/एज्युकेटर** ची प्रतिक्षायादी तयार करण्याकरीता खालील अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांची थेट मुलाखत **दि.२१/२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, नागपूर** येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय,**
**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नागपूर.**

| Sr.No | Name of Post | Age Criteria | Qualification | Place of Posting | Remuneration (Per Month Consolidated) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Peer Support / Educator | 18 to 38 Year | $12^{th}$ in Science with (Computer Knowledge (MS-CIT) | Kamptee, Hingna, Parshivani Saoner, Narkhed, Ramtek, Kalmeshwar, Bhiwapur, Nagpur, Umred, Mouda, Katol, Kuhi | Rs.8000 with Rs.2000 Traveling Allowance. Total Rs.10000/- |

पदाकरीता आवश्यक अर्हता-

- उमेदवार सिकलसेल ग्रस्त/ सिकलसेल वाहक (SS/AS) असावा, व शारिरीकदृष्ट्या सक्षम असावा.
- शासकिय संस्थेचा सिकलसेल HPLC चा Report बंधनकारक आहे.
- वयोमर्यादा १८ ते ३८ वर्ष राहील.
- उमेदवाराची शैक्षणिक अर्हता किमान १२ वी पास असावी. विज्ञान विषयास प्राधान्य देण्यात येईल
- उमेदवार MS-CIT उत्तीर्ण असावा.
- तोंडी चाचणीत उमेदवाराच्या वक्तृत्वास प्राधान्य देण्यात येईल.
- ज्या तालुक्यातील पद रिक्त आहेत किंवा होतील त्या तालुक्यातील उमेदवारास सदर तालुक्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.
- सदर पदाकरीता फक्त नागपूर जिल्हयातील उमेदवार पात्र ठरतील.

उपरोक्त अर्हताधारक उमेदवारांनी मुलाखतीला येतांना त्यांचे आवश्यक सर्व मुळ (Original) दस्ताऐवज व त्याचा १ झेरॉक्स संच मुलाखतीला येतांना सोबत आणावा.

पिअर सपोर्टर / एज्यूकेटर पद भरण्यासाठी वरील अर्हता धारण करणाऱ्या इच्छूक उमेदवारांकडून अर्ज सदर कार्यालयात मागविण्यात येत आहे. प्राप्त अर्जाची नोंदणी तालुका निहाय करण्यात येईल व पदाकरिता आवश्यक अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखती करिता बोलाविण्यात येईल.

१) मुलाखती करीता नोंदणी सकाळी १० ते ११ या कालावधीमध्ये होईल. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीला येतांना त्यांचे आवश्यक सर्व मुळ (Original) दस्ताऐवज, व सदर कागदपत्रांचा १ झेरॉक्स बंच सह मुलाखतीला विहित वेळेत उपस्थित राहावे.
२) सदर मुलाखत ही फक्त प्रतिक्षायादी तयार करण्याकरीता आहे.पिअर सपोर्टरच्या रिक्त होणा-या पदानुसार सदर पदावर उमेदवाराची निवड करण्यात येईल.
३) उमेदवारांच्या पदभरतीचे संपुर्ण अधिकार सक्षम पदभरती समितीने राखुन ठेवलेले आहे.
४) दोनपेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या उमेदवारांना राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी पदावर यापुढे निवड करण्यात येणार नाही. या करिता लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र अर्जा सोबत दिलेल्या नमुन्यानुसार सादर करावे.
५) सविस्तर जाहीरात, पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, निवड/प्रतिक्षा यादी व पदभरती प्रक्रियेबाबची सर्व माहीती/सुचना राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद नागपूर जिल्हयाच्या **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल याबाबत अर्जदारास कुठलाही स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही.

**नोट-दि.१९-०५-२०२३ रोजीच्या वृत्तपत्रातील जाहीराती नुसार सदर पदभरती प्रक्रियेची प्रतिक्षायादी दि. ०७-०७-२०२४ पर्यत वैध आहे. सदर वैध प्रतिक्षायादी तालुका निहाय तयार केली असुन या यादीतील उमेदवारांना प्राधान्याने रिक्त पदावर नियुक्ती देण्यात येईल.सदर तालुका निहाय यादी संपल्यानंतरच सध्याच्या प्रकाशित जाहीरातीमधुन तयार होणा-या प्रतिक्षायादीतील उमेदवाराची निवड करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर